N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

मोहाडी स्टेशन डायरी

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 154 Cr.P.C.)

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** भंडारा **P.S.(ठाणे):** मोहाडी **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0121 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 09/08/2021 17:08 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार

**Time Period (कालावधी):** पहर 5

**Date From (दिनांक पासून):** 10/06/2021

**Date To ( दिनांक पर्यंत):** 10/06/2021

**Time From (वेळेपासून):** 13:53 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 14:24 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 09/08/2021 **Time (वेळ):** 13:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 022 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 09/08/2021 16:31 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 0.1 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पोलीस स्टेशन मोहाडी ,मोहाडी , 441909

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** विनोद बाळाजी वानखेडे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1988 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

फिर्याद पोलीस स्टेशन मोहाडी दिनांक:-०९/०८/२०२१, मी विनोद बाळाजी वानखेडे, वय ३३ वर्षे धंदा - ड्रायव्हर , रा. झुल्लर ता. मौदा जिल्हा नागपूर, मो.न. ९८६०५३९०९३

मी दिनांक १०/०६/२०२१ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो, भंडारा येथील पोलीस निरीक्षक श्री. योगेश्वर पारधी यांचे कडे श्री. जाधव साहेब पोलीस स्टेशन मोहाडी यांचे विरुध्द लाच मागणी संबंधाने तोंडी तक्रार नोंदविली. मी नोंदविलेली तोंडी तक्रार खालील प्रमाणे आहे.

## तोंडी तक्रार

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, भंडारा
दिनांक १०/०६/२०२१ चे १०:०० वा.

नाव :- विनोद बाळाजी वानखेडे, वय ३३ वर्षे धंदा - ड्रायव्हर , रा. झुल्लर ता. मौदा जिल्हा नागपूर, मो.न. ९८६०५३९०९३

मी समक्ष लाचलुचपत प्रतिबंधक विभाग भंडारा येथे येवुन तोंडी तक्रार देतो की, वर नमुद पत्यावर राहतो व ड्रायव्हर म्हणुन काम करतो.

माहे डिसेंबर २०१९ मध्ये एम.एच ४०/बिएल-६३०१ ही गाडी मी एस.के. फोजन फुड कॅरिअर प्रा. लि. कडुन खरेदी केली. सदर गाडी ही ट्रॉन्सपोर्ट कामाकरीता वापरत होतो. काही कारनांमुळे ऑक्टोबर २०२० मध्ये मि ती गाडी अखील अशोकराव भोंगाडे यांना विकली परंतु श्री. अखील भोंगाडे यांनी मला पुर्ण पैसे दिले नसल्याने गाडीचे कागदपत्रे हस्तांतरीत झाले नव्हते.

माहे जानेवारी २०२१ मध्ये अखील भोंगाडे यांचे ताब्यात ति गाडी असतांना तो गाडीचा रेती वाहतुकी करीता वापर करीत होता व त्याच कारनामुळे सदर गाडी पोलीस स्टेशन मोहाडी येथे पकडुन लावली. तेव्हा पासुन गाडी मोहाडी पोलीस स्टेशनला उभी आहे. सदर गाडी सोडविण्याकरीता श्री. अखील भोंगाडे यांनी काहीच केले नसल्याने मी मार्च २०२१ मध्ये मोहाडी न्यायालयात गाडी सोडविण्याकरीता अर्ज केला होता.

मी मार्च २०२१ मध्ये मोहाडी पोलीस स्टेशन येथे गेलो असता श्री. जाधव साहेब यांनी मला माझी गाडी सोडविण्याकरीता से देण्यासाठी मला ५०,०००/- रूपये लाचेची मागणी केली त्यावर मी माझ्याकडे ५०,०००/- रूपये नसुन मी केवळ २०,०००/- रूपये देवु शकतो असे सांगीतले होते.

दिनांक ०८/०६/२०२१ रोजी मोहाडी पोलीस स्टेशन मधील श्री. जाधव साहेब यांनी त्यांचे मोबाईल क्रमांक ८७६६८८३४९४ वरुन माझे मोबाईल क्रमांक ९८६०५३९०९३ वर फोन करून, तु पोलीस स्टेशनला ये आणि आपल्या गाडीचा से घेवुन जा असे सांगीतले. मला श्री. जाधव साहेब यांनी यापुर्वीच से देण्यासाठी ५०,०००/- रूपये मागीतले होते. ते मला से देतांणा परत पैस्याची मागणी करतील. मला श्री. जाधव साहेब यांना लाच देण्याची मुळीच इच्छा नसल्याने मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग भंडारा येथे येवुन जाधव साहेब यांचेवर कार्यवही होण्यास तोंडी तक्रार देत आहे.

हिच माझी तोंडी तक्रार आहे. माझे सांगणेप्रमाणे लॅपटॉपवर टाईप केली प्रिंट काढुन मला वाचण्यास दिली. वाचुन पाहीले बरोबर आहे.'' अशी तोंडी तक्रार दिली होती.

पोलीस निरीक्षक श्री. पारधी यांनी लाचेच्या संबंधाने पडताळणी व सापळा कार्यवाही आयोजित करण्यासाठी दोन शासकीय पंचाना बोलावून घेवून त्यांना मी दिलेली तोंडी तक्रार कार्यालयीन लॅपटॉपवर टंकलिखित करून, त्यांची प्रिंट काढुन, ती मला व दोन्ही पंचाना वाचण्याकरीता दिली. मी व दोन्ही पंचांनी तोंडी तक्रार वाचुन बरोबर असल्याची खात्री करून त्याचेवर सहया केल्या. त्यानंतर श्री. पारधी साहेब यांनी मला श्री. जाधव साहेब पोलीस स्टेशन मोहाडी हे कुठे हजर मिळतील ? याबाबत विचारपुस केली तेव्हा मी श्री. पारधी साहेब यांना श्री. जाधव साहेब हे त्यांचे पोलीस स्टेशन मोहाडी येथे हजर असतील असे सांगीतले त्यावरुन श्री. पारधी साहेब यांनी मी दिलेल्या तोंडी तक्रारीवर पडताळणी कार्यवाही आजच करावयाची आहे असे सांगुन पडताळणी कार्यवाही ही मोहाडी अलीकडील दहेगांव परिसरातुन करावायची आहे असे सांगीतले व त्यांचे कार्यलयातील व्हॉईस रेकॉर्डरची माहिती दिली. त्यांनतर मी आपल्या कडील मोटार सायकलने, व ॲन्टी करप्शनचे अधिकारी व कर्मचारी हे कार्यवाहीतील दोन्ही पंचाना घेवुन त्यांचे कडील दोन वेगवेळया मोटारसायकलने असे मिळुन आम्ही मोहाडी जवळील दहेगाव परिसरात जाण्यास निघुन दहेगाव परिसरात पोहचलो त्यानंतर श्री. पारधी साहेब यांनी पडताळ

विनोद बाळाजी वानखेडे



ठाणे अंमलदार
पोलीस स्टेशन, मोहाडी
जि. भंडारा

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | झुल्लर ,मौदा ,मौदा,नागपुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | झुल्लर ,मौदा ,मौदा,नागपुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9860539093

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. अनुप टिकाराम वालदे | | | 1. यशोदा सिटी, घर क्र जे 5, बेला,भंडारा ,भंडारा,भंडारा,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

कायमी अप क्र. 121/2021 कलम 7 भ्र.प्र.का. सन 1988फिर्यादी - विनोद बाळाजी वानखेडे, वय 33 वर्शे धंदा - ड्रायव्हर , रा. झुल्लर ता. मौदा जिल्हा नागपूर. मो.नं.9860539093आरोपी लोकसेवकः- श्री. अनुप टिकाराम वालदे,वय 31, पोलीस नायक,ब.नं.1249, पोलीस स्टेशन मोहाडी जिल्हा भंडारा, रा. यशोदा सिटी, घर क्र. जे 5, बेला. ता. जि. भंडारा घटनास्थळ :- पोलीस स्टेशन मोहाडी येथील.घटनाता. वेळ:- दिनांक10/06/2021 चे 13.53 वा. ते 14.24 वा. दरम्यानलाचेची मागणी:- 500/- रूपये प्रकरण अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी यातील आरोपीने आपले लोकसेवक पदाचा दुरूपयोग करून स्वतःचे आर्थीक लाभाकरीता यातील फिर्यादी/तक्रारदार यांना त्यांचे पोलीस स्टेशन मोहाडी येथे अटकावुन ठेवलेली गाडी संबधाने मा. न्यायालय मोहाडी येथे हजर राहण्याबाबतचा नोटीस दिला सदर नोटीस दिल्याचा मोबदला म्हणुन 500/- रूपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविल्याने आरोपी विरूध्द वर नमुद कलामान्वये गुन्हा नोंद करून तपासात घेतला.दाखल अंमलदार पो.ना. पवन बलराम राऊत ब.नं.856, पोलीस स्टेशन मोहाडी जि.भंडारा मो.नं. 9284013219तपास अधिकारी:-श्री. योगेश्वर पारधी, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग भंडारा मो. नं.9405157507

13. **Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Rahul Pandurang Deshpande(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):**

**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

णी कार्यवाही करण्याचे ठरवुन पडताळणी कार्यवाही बाबत मला आणि दोन्ही पंचाना मी दिलेल्या तक्रारीची पडताळणी बाबतच्या सुचना दिल्या. त्यांनतर पडताळणी करीता मी व पंच दिवटे यांचे सह श्री. जाधव साहेब यांना भेटण्याकरीता व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन व माझ्या गळयात लटकवुन दिल्यानंतर माझ्या दूचाकी मोटारसायकल क्रमांक एमएच-४०/ए.डब्ल्यु-०५३१ ने पोलीस स्टेशन मोहाडी येथे गेलो.

पोलीस स्टेशन मोहाडी येथे गेलो तेव्हा श्री. जाधाव साहेब हे हजर नव्हते. तेव्हा मी तीथे असलेल्या पोलीसांना श्री. जाधव साहेब यांचेबाबत विचारपुस केली तेव्हा ते बाहेर गेले आहेत असे सांगीतले व त्यांचा रायटर श्री. वालदे पोलीस हे हॉलमध्ये हजर आहेत असे सांगीतले. तेव्हा मी श्री. वालदे पोलीस यांना भेटलो व श्री. जाधव साहेब यांचेबाबत विचारपुस केली तेव्हा वालदे यांनी जाधव साहेब बाहेर गेले आहेत असे सांगुण श्री वालदे पोलीस यांचे सोबत माझे कामाबाबत बोलणी केली तेव्हा श्री. वालदे पोलीस यांनी मला माझी गाडी सुप्रुतनाम्यावर सोडण्याबाबत कोर्टात हजर होण्याबाबतचा नोटीस देवुन मला ५००/- रूपये लाचेची मागणी केली, त्यावरुन मी व पंच दिवटे देहेगाव परिसरात श्री पारधी साहेब थांबुन असलेल्या ठिकाणी परत आलो. मी पंचासह देहेगाव परिसरात परत आल्यावर श्री. पारधी साहेब यांनी माझ्या गळयातील व्हाईस रेकॉर्डर काढुन त्यामधील रेकॉर्ड झालेले संभाषण दोन्ही पंचासमक्ष ऐकुण लाचेची मागणी झाली असल्याची शहानिशा केली. व पडताळणी कार्यवाहीचा पंचनामा हा गोपनीयतेच्या दृष्टीने अॅन्टी करप्शन कार्यालय भंडारा येथे पोहचुन करण्याचे ठरवुन मी,श्री. पारधी साहेब, दोन्ही पंच व पोलीस स्टॉप सह अॅन्टी करप्शन कार्यालयात परत आलो. श्री. पारधी साहेब यांनी केलल्या कार्यवाहीचा पंचनामा तयार केला.

तरी श्री. वालदे पोलीस पोलीस स्टेशन मोहाडी, यांनी दिनांक १०/०६/२०२१ रोजी मला माझी गाडी सुप्रुतनाम्यावर सोडण्याबाबत कोर्टात हजर होण्याबाबतचा नोटीस देवुन मला ५००/- रूपये लाचेची मागणी केली होती. श्री. वालदे पोलीस हे माझ्याकडुन ५००/- रूपये लाच रक्कम स्विकारणार नाही अशी माझी खात्री असल्यामुळे मी आज दिनांक ०९/०८/२०२१ रोजी श्री. वालदे पोलीस, पोलीस स्टेशन मोहाडी यांचे विरुध्द कार्यवाहीस्तव: मी फियार्द देत आहे.

हिच माझी फिर्याद आहे. माझी वरिल फिर्याद प्रिंट काढुन मला वाचण्यास दिली असुन, ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर संगणकावर टंकलिखीत करण्यात आली आहे. त्यावर मी सही केली.

(signature) विनोद बाबुराव वानखेडे

ठाणे अंमलदार
पोलीस स्टेशन, मोहाडी
जि. भंडारा

पोलीस स्टेशन मोहाडी

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.** (आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

विनोद बालाजी वानखेडे

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): Rahul Pandurang Deshpande
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

ठाणे अंमलदार
पोलीस स्टेशन, मोहाडी
जि. भंडारा

पो.ना. पवन ब. राऊत
नं. १५६ पो.स्टे. मोहाडी.

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /**
(संशयीत/आरोपीचे **(माहित असलेल्या/पाहिलेल्या)** शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**